B Nmc/OIT/1355
18/10/2023

सामान्य प्रशासन विभाग
क्रं सा.प्र.वि./693/एम
दि. 18-10-2023

## बैठकीचे इतिवृत्त

६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने मा.आयुक्त तथा प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि.१०/१०/२०२३ रोजी सायंकाळी ०५-०० वाजता नागपूर महानगरपालिकेच्या मुख्यालयातील श्री.छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय भवन सभागृहात आढावा बैठक घेण्यात आली, त्या बैठकेतील चर्चेचे संक्षिप्त इतिवृत्त.

सदर बैठकीत खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र | उपस्थितांचे नाव | पदनाम |
|---|---|---|
| १ | श्रीमती आंचल गोयल (भाप्रसे) | अति.आयुक्त (शहर) |
| २ | डॉ.सुनिल लहाने | अति.आयुक्त (सामान्य) |
| ३ | श्री.राजीव गायकवाड | मुख्य अभियंता |
| ४ | श्री.निर्भय जैन | उपायुक्त (सा.प्र.वि.) |
| ५ | श्री.रविंद्र भेलावे | उपायुक्त (उद्यान) |
| ७ | श्री.गजेंद्र महल्ले | प्र.उपायुक्त तथा संचालक घनकचरा |
| ८ | श्री.मनोज तालेवार | अधिक्षक अभियंता (सा.बा.वि) |
| ९ | डॉ. श्वेता बॅनर्जी | अधिक्षक अभियंता (सा.आ.अ.वि) |
| १० | श्री.नरेंद्र बहिवार | वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ११ | श्रीमती साधना सयाम | शिक्षणाधिकारी, मनपा नागपूर |
| १२ | श्री.बी.पी.चंदनखेडे | मुख्य अग्नीशमन अधिकारी |
| १३ | श्री.मिलींद मेश्राम | सहा.आयुक्त झोन क्र. १. |
| १४ | श्री.श्रीकांत वाईकर | कार्यकारी अभियंता (जलप्रदाय) |
| १५ | श्री.रविंद्र बुंधाडे | कार्यकारी अभियंता, लक्ष्मीनगर झोन क्र १ |
| १६ | श्री.विजय जोशी | अतिरिक्त वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| १७ | श्री.मनिष सोनी | जनसंपर्क अधिकारी |

| अनु. क्र. | चर्चा करण्यात आलेले विषय | मा. प्रशासक तथा आयुक्त यांचे बैठकीतील निर्देश | संबंधित विभाग / अधिकारी |
|---|---|---|---|
| १ | ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या पुर्वतयारीच्या अनुषंगाने करण्यात येणा-या संपुर्ण व्यवस्थे संदर्भात आढावा घेण्यात आला. | १. ६७ व्या धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने नागपूर महानगरपालिकेव्दारे दिक्षाभुमी येथे सर्व मुलभूत सुविधांची व्यवस्था करण्यात यावी. दिक्षाभुमी स्मारक समिती मार्फत धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दिक्षाभुमी परिसरात स्टॉल लावण्याकरीता जी परवानगी देण्यात येते त्या दृष्टीने अग्नीशमन विभागाने अपघात होऊ नये या करीता सर्व स्टॉलचे निरीक्षण करावे, आवश्यक त्या ठिकाणी अग्नीशमन उपकरणे लावण्याबाबत संबंधितास कळवावे, जेथे अपघात होण्याची संभावना असल्यास त्या ठिकाणी बदल करण्यास समितीला सूचित करावे. दिक्षाभुमी या परिसरात आवश्यक कर्मचारीसह फायर टेन्डरची व्यवस्था चोख ठेवण्यात यावी. अग्नीशमन विभागाने एक नियंत्रण कक्ष स्थापन करावे त्या ठिकाणी २४ तास कर्मचारी उपस्थित राहतील त्या अनुषंगाने विभागातर्फे आदेश काढण्यात यावे. अग्नीशमन विभागाचे साहित्य व वाहनांचे नियोजित ठिकाण कुठे आहे ते दर्शविण्यासाठी चौकाच्या दर्शनी भागावर माहितीदर्शक फ्लेक्स लावण्यात यावे. | १.मुख्य अग्नीशमन अधिकारी |
| २ | | २. आपातकालीन प्रसंगी दिक्षाभुमी परिसरातील लगतच्या मनपा शाळा तसेच शासकीय/निमशासकीय इमारती येथे भाविकांची राहण्याची व्यवस्था करण्यात यावी. भाविकांची राहण्याची व्यवस्था कुठे करण्यात आलेली आहे ते दर्शविण्याकरीता माहितीदर्शक फलक चौकांच्या दर्शनी भागावर लावण्यात यावे व दरवर्षी प्रमाणे सर्व व्यवस्था करण्यात यावी. | १.सहा.आयुक्त, लक्ष्मीनगर झोन क्रमांक १.<br>२. शिक्षणाधिकारी |
| ३. | | ३. दिक्षाभुमी या परिसरामध्ये संपूर्ण मार्गावर पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. तात्पूरत्या स्वरुपात ज्या ठिकाणी शौचालयाची व्यवस्था करण्यात आलेली आहे त्या ठिकाणी २४ तास पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. मोबाईल टॉयलेटची टाकी भरण्याकरीता दर तीन ते चार तासांनी टॅंकरव्दारे पाणीपूरवठा करण्याचे नियोजित करावे. पिण्याच्या पाण्याची तपासणी करुन घ्यावी. पाणीपुरवठा खंडीत होऊ नये याकडे विभागाने जातीने लक्ष दयावे. | १. अधिक्षक अभियंता (सा.आ.अ.वि) |

| | | | |
|---|---|---|---|
| ४. | | ४. दिक्षाभुमी येथील मुख्य मार्गावर आरोग्य तपासणी केंद्राची व्यवस्था करण्यात यावी. त्या ठिकाणी डॉक्टरांची टिम व ॲम्बुलन्स २४ तास ठेवण्यात यावे. आरोग्य तपासणी केंद्रात येणा-या भाविकांना दिसेल या दृष्टीकोणातून दर्शनी भागावर फलक लावण्यात यावे. आरोग्य तपासणी केंद्रामध्ये औषधे व इतर साहित्य मुबलक प्रमाणात उपलब्ध ठेवावे. त्याचप्रमाणे २४x७ कर्मचा-यांची डयुटी लावण्यात यावी, याबाबत संबंधित विभागाने आदेश निर्गमीत करण्यात यावे. | १.वैद्यकीय आरोग्य अधिकारी |
| ५. | | ५. दिक्षाभुमी या परिसरात साफसफाईच्या कामाकडे विशेष लक्ष देण्यात यावे, संपूर्ण परिसर २२ तारखेपर्वू साफ करुन घ्यावा. शौचालयाच्या साफसफाईच्या व्यवस्थेकरीता एक वेगळी टिम नियुक्त करावी. मोबाईल टॉयलेट वेळोवेळी स्वच्छ ठेवण्याकडे विशेष लक्ष दयावे. धम्मचक्र प्रवर्तन दिनानिमित्ताने या भागात अन्नदान केंद्र उघडण्यात येतात त्या भागात नियमीत साफसफाई करण्यात यावी. सदर कालावधीत संपूर्ण परिसर स्वच्छ राहील यासाठी आवश्यक सर्व उपाययोजना करण्यात याव्यात. | १.उपायुक्त घनकचरा व्यवस्थापन |
| ६. | | ६. शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र या ठिकाणी तात्पूरत्या स्वरुपात शौचालयाची व्यवस्था करण्यात येते त्या ठिकाणी उघडयावर घाण व दुर्गधी पसरु नये या अनुषंगाने अभियांत्रिकी विभागाव्दारे कोणती उपाययोजना करणे सोयीचे होईल या दृष्टीकोणातून अधिक्षक अभियंता साबावि / सा.आ.अ.वि यांनी मोक्याचे निरीक्षण करावे. शौचालयामध्ये जे कापडी पार्टीशन करण्यात आले आहे त्या ठिकाणी टिन किंवा इतर साहित्य वापरणे शक्य असल्यास त्याची योग्य पडताळणी करुन निर्णय घ्यावा. | १.अधिक्षक अभियंता (सा.आ.अ.वि) २. अधिक्षक अभियंता (सा.बा.वि.) ३.कार्यकारी अभियंता, झोन क्र. १ |
| ७. | | ७. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने जे भाविक दिक्षाभुमी या ठिकाणी येतात त्यांच्या विश्रांतीकरीता शासकीय औद्योगिक प्रशिक्षण केंद्र व अंध विद्यालय येथे दरवर्षीप्रमाणे मंडपाची व्यवस्था करण्यात यावी. तेथे नागरिकांच्या सोयी करीता मदत कक्ष स्थापन करण्यात यावे, पोलीस विभागाशी समन्वय ठेवून त्या भागात बॅरेकेटींग करण्यात यावे. | १.अधिक्षक अभियंता (सा.बा.वि.) २.कार्यकारी अभियंता, झोन क्र १. |

| | | | |
|---|---|---|---|
| ८. | | ८. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दरवर्षी प्रमाणे मनपा केंद्रीय नियंत्रण कक्षातील अधिकारी / कर्मचा-यांचे आदेश काढावे, याबाबतची कार्यवाही सामान्य प्रशासन विभागाने करावी. त्याचबरोबर विभाग निहाय जे आदेश काढण्यात येते त्याबातची कार्यवाही विभाग प्रमुखांनी करावी. | १.उपायुक्त (सा.प्र.वि) २.सर्व संबंधित विभाग प्रमुख |
| ९. | | ९. धम्मचक्र प्रवर्तन दिनाच्या निमित्ताने दिक्षाभुमी या परिसरात दरवर्षीप्रमाणे विद्युत व्यवस्था चोख ठेवण्यात यावी, विद्युत व्यवस्थेच्या बॅकअप करीता जनरेटरची व्यवस्था करण्यात यावी. संपूर्ण परिसराच्या विद्युत व्यवस्थेची सर्व कामे २१ तारखेच्या आत पूर्ण करुन घ्यावे. त्या परिसरातील सर्व सीसीटीव्ही कॅमेरे चेक करुन घ्यावे, जे नादुरुस्त स्थितीत असेल ते दुरुस्त करुन घ्यावे तसेच काही सीसीटीव्ही कॅमेरे, LED स्क्रीन तात्पूरत्या स्वरुपाचे लावायचे असेल तर ते लावण्यात यावे व कॅमेरांची बॅकअपची व्यवस्था करण्यात यावी. त्या परिसरातील पथदिवे व ट्राफीक सिंग्नल बंद असेल तर ते त्वरीत सुरु करण्याबाबत उचित दखल घ्यावी. | १.कार्यकारी अभियंता (विद्युत) |
| १०. | | १०. दिक्षाभुमी या परिसरात विद्युत विभागाकडून जी एल.ई.डी. स्क्रीन लावण्यात येणार आहे त्या स्क्रीनवर महानगरपालिकेकडून कोणत्या सुविधा पुरविण्यात येतात तसेच मनपाव्दारे राबविण्यात येणा-या विविध योजनेबाबत माहिती, शहर स्वच्छतेबाबत माहिती, दिक्षाभुमी येथे येणा-या भाविकांसाठी ज्या सुविधा करण्यात आलेल्या आहेत त्याबाबत संपूर्ण माहिती अशा स्वरुपाचा माहिती दर्शक व्हीडीयो जनसंपर्क विभागाने तयार करुन घ्यावा, त्यामध्ये प्लास्टीक फ्री व परिसर स्वच्छ ठेवण्याबाबत नागरिकांना आव्हान करण्यात यावे. | १.जनसंपर्क अधिकारी, मनपा |
| ११. | | ११.परिवहन विभागाव्दारे बस स्थानक, रेल्वे स्टेशन येथून दिक्षाभुमी ड्रॅगन पॅलेस इत्यादी महत्वाच्या स्थळी जाण्याकरीता बसची व्यवस्था करण्यात यावी. ज्या परिसरात भाविक बसने जातील त्या परिसरातील बसचा मार्ग व वेळ निश्चित करुन एकत्रित माहिती तयार करावी. ही सर्व माहिती दिक्षाभुमी परिसरामध्ये लावण्यात येणा-या एल.ई.डी. स्क्रीनवर दर्शविण्यात यावी तसेच परिवहन विभागाने बसच्या माहितीचे विशेष फलक तयार करुन रेल्वेस्टेशन, बसस्थानक तसेच दिक्षाभुमी येथील दर्शनी भागावर लावण्यात यावे. | १.परिवहन व्यवस्थापक |

| | | | |
|---|---|---|---|
| १२. | | १२. संबंधित रस्त्यावरील खड्डयांची डागडुजी / दुरुस्ती मुदतीत करुन घेण्यात यावी. | १.कार्यकारी अभियंता, हॉटमिक्स |
| १३ | | १३. सर्व संबंधित मनपा अधिका-यांनी दरवर्षीप्रमाणे ज्या उपाययोजना / सुविधा केल्या जातात, त्या याही वर्षी करण्यात याव्यात तसेच मनपास सोपविण्यात येणा-या जबाबदा-यांचे अनुषंगाने काही अतिरिक्त सुविधा करावयाच्या असल्यास संबंधित विभागाने वरिष्ठ अधिका-यांशी चर्चा करुन त्या कराव्यात. या संबंधाने कोणतीही संदिग्धता / असमन्वय निर्माण झाल्यास ती आयुक्त / अति.आयुक्त यांचेशी चर्चा करुन तातडीने दुर करण्यात यावी. | १. सर्व संबंधित विभाग प्रमुख |

**डॉ.अभिजीत चौधरी (भा.प्र.से)**
**प्रशासक तथा आयुक्त**
**महानगरपालिका, नागपूर**

**<u>प्रतिलिपी आवश्यक कार्यवाहीस्तव</u>**

१. अति.आयुक्त (शहर), मनपा,नागपूर.
२. अति.आयुक्त (सामान्य),मनपा,नागपूर.
३. मुख्य अभियंता, मनपा, नागपूर.
४. सर्व विभाग प्रमुख मनपा,नागपूर.
५. परिवहन व्यवस्थापक, मनपा,नागपूर.
६. कार्यकारी अभियंता, (जलप्रदाय विभाग/लक्ष्मीनगर झोन क्र.१) मनपा,नागपूर.
७. सहा.आयुक्त झोन क्र १ मनपा,नागपूर.
८. जनसंपर्क अधिकारी, मनपा नागपूर.